PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sangate Aika
Year: 1959

Song: Chandra Pahata Say Pritichi
Lyricist: Ga. Di. Madgulkar

चंद्र पाहता सय प्रीतीची
तरूण मना का येते

चंद्र आणखी प्रीती यांचे
काय असावे नाते
चंद्र आणखी प्रीती यांचे
काय असावे नाते

अगं कलावती तू
तुला असावी अचूक
तयाची जाण गं
अन् प्रीत नगरचा राजा मन मन
चंद्र तयाचा प्रधान गं
अगं प्रीत नगरची प्रजा
तयाच्या मुजऱ्यासाठी येते
अन् प्रधान साक्षी ठेवून
राणी आण प्रीतीची घेते

तोंडावरती जडे काळीमा
झिजते ज्याची कला कला
तो मदनाचा मंत्री कैसा
समजूनी सांगा तुम्ही मला
तो मदनाचा मंत्री कैसा
समजूनी सांगा तुम्ही मला
गुरूपत्नीशी पाप करी हा
शाप बाधला यासी
चंद्र आणखी प्रीती यांचे
काय असावे नाते
चंद्र आणखी प्रीती यांचे
काय असावे नाते

अगं चंद्र उगवता
समुद्र उसळे चढती डोंगरलाटा
अन् तो देखावा प्रीतरसाचा
शाहीर म्हणती मोठा
अगं नभ धरणीचे अंतर
त्यांच्या प्रीतीने तुटते

अन् चंद्र आणखी प्रीती यांचे
तूच ठरव गे नाते
लाटा उठती सागरात ज्या
त्या तर त्याच्या लेकी
चंद्र लहरींची प्रीत जोडीती
त्यांची फिरती डोकी
चंद्र लहरींची प्रीत जोडीती
त्यांची फिरती डोकी
सख्खी बहीण अन् सख्ख्या भावाचे
प्रीत कधी का होते
चंद्र आणखी प्रीती यांचे
काय असावे नाते
चंद्र आणखी प्रीती यांचे
काय असावे नाते

अगं चंद्र कसा ग होईल भाऊ
उगाच सागर लाटांचा
अन् आधारासी दाव पुरावा
नको धिटावा ओठांचा
देव दानवी समुद्र मंथन

Literacy for a Billion

पुराणांतही केले ना
मंथनात त्या रत्न चंद्रमा
उसळून वरती आले ना
मंथनात त्या रत्न चंद्रमा
उसळून वरती आले ना
जन्म पावला सागर पोटी
तो तर त्याचा बेटा

त्याच सागरी जन्मतात ना
निळया उसळत्या लाटा
अहो बहीण भाऊ याहून कुठले
चंद्र लहरींचे नाते
चंद्र पाहता सय प्रीतीची
तरूण मना का येते
हो तरूण मना का येते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*